भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०८/२०१७

**१) मोटार पंपची चोरी . :–**

दिनांक ३०/०७/२०१७ ते ३१/०७/२०१७ चे १७.३० ते ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी माणीक शंकर देवगडे वय ६९ वर्ष, रा. शहापुर यांचे शेतावरील बोरवेलला लावलेली १ एचपी कंपनीची मोटार पंप किंमती ८,०००/–रु. कोणीरती अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३०/०७/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपले घरी जेवन करीत असतांना आरोपी हा त्याचे घरा समोर दारु पिवुन येवन तुला फुकटाचे पैसे भेटतात असे टोम्पे मारुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन दैनिक जिवनावश्यक वस्तु न दिल्याने निंबाच्या झाडावर चढुन ३३ केव्ही इलेक्ट्रीक ताराला त्याचे शरीराचे स्पर्श होवुन मुलाचा मृत्यु . :–**

दिनांक ३०/०७/२०१७ चे ०७.३० वा. दर. यातील आरोपीतांनी निष्काळजीपना करुन यातील मृतक यास दैनीक जिवनावश्यक वस्तु टुथपेस्ट, ब्रश व मंजन न पुरविल्याने मृतक महेन्द्र धरमदास सलामे वय १५ वर्ष, रा. खैरी ता. तिरोडा जिल्हा गोदिंया हा लिबांच्या झाडाच्या फांदीपासुन दात घासण्याचे दातुन तयार करण्याकरीता लिबांच्या झाडावर चढला व फांदी तोडत असता निंबाच्या झाडावरुन गेलेल्या ३३ केव्ही इलेक्ट्रीक चे ताराला त्याचे शरीराचे स्पर्श झाल्याने त्यास विद्युत करंट लागुन तो झाडावरुन जमीनीवर खाली पडुन मरण पावल्याने मर्ग क्र. १४/१७ कलम १७४ जाफौ चे चौकशी अहवाल व मृतक याचा शव विच्छेदन अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. सोलंकी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३०४(अ), ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन विवाहितेस शारीरिक व मानसिक त्रास देवुन हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंद . :–**

सन २०१५ ते दिनांक ०५/०९/२०१६ पर्यत. यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस तुझ्या आई वडीलांनी लग्नामध्ये मोठे सामान वॉशीग मशीन, टिव्ही, राजा सोफा, सोन्याचा गोप ई. वस्तु दिल्या नाही त्यामुळे त्याचे कडुन २,००,०००/–रु. घेवुन ये असे म्हणाले फिर्यादीने त्याची मागणी पुर्ण न केल्याने तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन मारपीट करुन शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४९८(अ), ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) जनरल स्टोर्स दुकानाचे जेसीपीने समोरील छत तोड्डन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०७/२०१७ ते १२/०७/२०१७ चे रात्र दरम्यान. यातील फिर्यादी रामभाऊ श्रावणजी वंजारी वय ७६ वर्ष, रा. सुभाष वार्ड भंडारा याचे श्रीराम जनरल स्टोर्स दुकानाचे समोरील छत(स्लॅप) हे कोणीरती अज्ञात जेसीपी चालकाने जेसीपी आणुन छताचे स्लॅपला जेसीपीचा पंजा मारुन समोरील छत तोडुन नुकसान केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४४७,४४८,४२७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

६) विद्युत करंट लागुन इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ३१/०७/२०१७ चे १३.१५ वा. दर. यातील फिर्यादी मदनलाल हरीचंद्र देशमुख वय ४७ वर्ष, रा. फ्रेन्ड कॉलोनी सेंदुरवाफा याचा भाऊ मृतक दिलीप हरीचंद्र देशमुख वय ४९ वर्ष, रा. फ्रेन्ड कॉलोनी सेंदुरवाफा हा घरी कुलरचे प्लग लावी असतांनी त्याचे डावे हाताचे अंगठयाजवळ तळहाताला विद्युत करंट लागुन गंभिर जखमी झाल्याने त्यास औषधउपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे आणले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टर मेमो वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मडावी पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

७) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिनांक २९/०७/२०१७ चे १६.०० दर. यातील मृतक हुंदेश्वर सिताराम मेश्राम वय ३३ वर्ष, रा. मुरमाडी तुपकर याने विष प्राशन केलेल्या स्थितीत मिळुन आल्याने त्यास औषधोपचारा करीता सा.रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. वासनिक यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

८) अचानक छातीत दुखत असल्याने इसमाचा मृत्यु . :–

दिनांक ३१/०७/२०१७ चे ०८.०० ते १०.०० वा. दर. यातील मृतक अशोक राघो लोहके वय ६२ वर्ष, रा. धुळे ह. मु. हरदोली यांचे छातीत दुखत असल्याने त्यास औषधउपचारा करीता ग्रामीण रुग्णालय मोहाडी येथे आणले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टर मेमो वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

९) गरोदर महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–

दिनांक ३०/०७/२०१७ चे १७.०० दर. यातील मृतक सौ. संगीता सतीश मेश्राम वय २५ वर्ष, रा. मोरगाव ही गरोदर असतांनी तिची प्रकृती बिघडल्याने तिला औषधोपचारा करीता नातेवाईकांनी सामान्य रुग्णालय भंडारा येथे दिनांक ३०/०७/२०१७ ला भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तुमाने यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुलबांधे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

१०) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ३१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे वरठी, लाखांदुर व भंडारा येथे अवैध दारू / जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ०८ लिटर हा.भ. दारू किंमती ४८०/–रु. १ लिटर ८०० मिली.लिटर देशी दारू कि. ५२०/रु तसेच जुगारातुन किंमती ४३२/–रु. असा एकुण १,४३२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.